अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ३१ मार्च २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १८१ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# बाजारात झाला दराचा वांदा, शेतकरी विकणार अनुदानावर कांदा

✔ सुराज्य/सोलापूर

**कष्टाने पिकवलेला कांदा शेतकऱ्यांनी हौसेने विक्रीसाठी बाजार समितीत आणला. अडत, वाहनभाडे आणि हमाली गेल्यानंतर गावाकडे जाण्यासाठी एसटी तिकिटाला पुरतील तितकेही पैसे हातात पडत नसल्यामुळे बेजार झालेल्या शेतकऱ्यांनी कांदा बांधावरच सडवला. एका शेतकऱ्याला तर फक्त दोन रुपयांचा पंधरा दिवसांनंतरचा धनादेश मिळाल्याची बातमी राज्यभर गाजल्यानंतर सरकारचे डोळे उघडले. त्यानंतर कांद्याला प्रतिक्किंटल साडेतीनशे रुपये अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली. आता शेतात सडणारा कांदा बाजार समितीत विकून किमान अनुदानाची रक्कम तरी पदरात पाडून घेण्याचे शेतकऱ्यांनी ठरवल्यामुळे गेल्या चार दिवसांपासून पुन्हा सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याची विक्रमी आवक सुरू झाली आहे.**



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि मराठवाड्यातून कांदा विक्रीसाठी येतो. यंदाच्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये वाचलेला कांदा साधारण डिसेंबर महिन्यात बाजार समितीमध्ये आला होता. त्यावेळी कांद्याला सरासरी अडीच हजारांपर्यंत प्रतिक्किंटल दर मिळाला होता. अतिवृष्टीनंतर लागण केलेला कांदा जानेवारीच्या अखेरीस बाजार समितीत आला. त्याची आवक प्रचंड झाल्यामुळे जानेवारी अखेरीस कांद्याचा दर प्रतिक्किंटल बाराशे रूपयांपर्यंत आला. त्यानंतर दरातील घसरण कायम राहिल्यामुळे शेवटी शेवटी पाचशे रुपयेसुध्दा दर मिळणे कठीण झाले. परिणामी बाजार समितीत आणलेल्या कांद्याचे वाहनभाडे, हमाली आणि अडत वजा जाता शेतकऱ्यांच्या हातात अत्यल्प रुपये पडले. येण्या-जाण्याचा खर्चही निघेना म्हणून पिकलेला कांदा बांधावरच सडवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली होती.

## ३१ मार्चपर्यंत विकलेल्या कांद्याला मिळणार अनुदान

काही शेतकऱ्यांनी कांदा विकून उलट अडत व्यापाऱ्यालाच पदरचे पैसे दिले होते. एका शेतकऱ्याला तर फक्त दोन रुपयांचा धनादेश तोही पंधरा दिवसांनंतरची तारीख टाकून देण्यात आला होता. ही बातमी प्रसारित संतप्त शेतकरी रस्त्यावर उतरले. त्यावेळी जागे झालेल्या सरकारने प्रतिक्किंटल कांद्याला ३५० रुपये अनुदान जाहीर केले. त्यानुसार १ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त २०० क्किंटलच्या मर्यादित अनुदान मिळणार आहे.

## कांद्याच्या एका पोत्याला दीडशे रुपये

बाजार समितीमध्ये कांदा विकून पैसे मिळत नसल्यामुळे काही शेतकऱ्यांनी त्यांचा कांदा शेतातच सडवण्याचा निर्णय घेतला. काही शेतकऱ्यांनी शहरात चौकाचौकात उभारून शंभरपासून दीडशे रुपयांत पोतेभर कांदे विकण्यास सुरुवात केली आहे. जेवढा विकेल तेवढा कांदा विकून मिळतील तेवढे पैसे घेऊन गावाकडे जाण्याचा मार्ग अशा शेतकऱ्यांनी स्वीकारला होता. त्यातच आता प्रतिक्किंटल साडेतीनशे रुपये अनुदान शासनाने जाहीर केल्यामुळे हा शेतकरी पुन्हा एकदा बाजार समितीकडे वळला आहे.

## पुन्हा कांद्याने बहरली बाजार समिती

बाहेर दीडशे रुपयाला क्किंटल कांदा विकण्यापेक्षा बाजार समितीमधून क्किंटलला साडेतीनशे रुपयांचे अनुदान तरी मिळेल, या आशेने शेतकऱ्यांनी कांदा बाजार समितीमध्ये आणायला सुरुवात केली आहे. गेल्या चार दिवसांत दररोज सरासरी पाचशे ट्रक कांद्याची आवक होत आहे. बुधवारी ४९०, गुरूवारी ५८० ट्रक कांदा बाजार समितीमध्ये आला आहे. सध्या सरासरी दर प्रतिक्किंटल १०० रुपयांपासून ७०० रूपयांपर्यंत मिळत आहे. त्याला अनुदानाची जोड मिळाल्यास चार पैसे पदरात पडतील; अशी शेतकऱ्यांना आशा आहे.

## गैरप्रकार केल्यास फौजदार करणार

शासनाने कांद्याला प्रतिक्किंटल साडेतीनशे रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. १ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत विक्री झालेल्या कांद्यालाच हे अनुदान दिले जाणार आहे. दरम्यान हे अनुदान लाटण्यासाठी काही गैरप्रकार होण्याची शक्यता आहे. तसे काही आढळून आल्यास संबंधितांवर फौजदार गुन्हे दाखल करण्यात येतील, शिवाय असे प्रकार करणाऱ्या अडते आणि व्यापाऱ्यांचे परवाने रद्द केले जातील, असा इशारा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिला आहे.

# आरोपीच्या नावाचा दुसराच माणूस पोलीस ठाण्यात हजर

### रमेश बारसकर अपघात प्रकरणाला लागले वेगळेच वळण

✔ सुराज्य/मोहोळ




राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस रमेश बारसकर यांच्या गाडीला अपघात करणारा ड्रायव्हरच्या नावाचा दुसरा माणूस मोहोळ पोलीस ठाण्यात येऊन हजर झाला. त्यामुळे मोहोळ पोलिसांची आता डोकेदुखी वाढली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस रमेश बारसकर हे सोलापूरहून मोहोळकडे येत असताना सावळेश्वर टोळ नाक्याजवळ त्यांच्या गाडीला अपघात करण्याचा प्रयत्न झाला. त्या ट्रक डायव्हरला मोहोळ पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याने त्याचे नाव शांतलिंगेश्वर बाबूराव ढाले (रा. नांदगाव, ता.तुळजापूर) असे सांगितले होते व त्याच्यावर मोहोळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. ही घटना २७ मार्च रोजी दुपारी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास सावळेश्वर टोलनाक्याजवळ घडली होती. इथपर्यंत सर्व ठीक होते. परंतु ही बातमी वाचून प्रत्यक्ष दुसरीच व्यक्ती मी शांतलिंगेश्वर बाबूराव ढाले आहे व माझ्यावर खोटा गुन्हा दाखल केला आहे, म्हणून मोहोळ पोलीस ठाण्यात हजर झाली. माझ्यावरील खोटा गुन्हा माघारी घेण्यात यावा, अशा मागणीचा अर्ज मोहोळ पोलिसांकडे दिला. त्यामुळे आता रमेश बारसकर यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केलेला 'तो' शांतलिंगेश्वर ढाले कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

जर तो शांतलिंगेश्वर ढाले नसेल तर त्याने तसे नाव का सांगितले? त्याने खोटे नाव का सांगितले? हा प्रश्न निर्माण झाला असून त्याचा नेमका उद्देश काय? बारसरकर यांना संपवण्याचा प्रकार होता की काय? असाही प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत मोहोळ पोलीस काय भूमिका घेणार व कसा तपास करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महामार्गातील मंजूर रक्कमेपोटी ७ हजारांची लाच स्वीकारल्याप्रकरणी गुन्हा

### ▸ तलाठी फरार, खासगी इसम जेरबंद



✔ **मंगळवेढा** : सोलापूर- सांगली राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ मधून गेलेल्या पाईपलाईनची मंजूर रक्कम १ लाख ४३ हजार ७९४ रुपये देण्यासाठी ७ हजारांची लाच स्वीकारून तलाठी आरोपी सुरज रंगनाथ नळे लाचेची रक्कम घेऊन फरार तर झिरो कर्मचारी तथा आरोपी पंकज महादेव चव्हाण (वय २२ रा.शेलेवाडी) याला पोलिसांनी जेरबंद केले.

दरम्यान झिरो कर्मचाऱ्यास न्यायालयापुढे उभे केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी दिली. पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील ५१ वर्षीय फिर्यादी शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते यांच्या मालकीची कमलापूर ता.सांगोला येथील गट नं.५२ मधून सोलापूर-सांगली राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ गेला आहे. या जमिनीमध्ये असलेली पाईपलाईन बाधित झाली असून पाईपलाईनची शासकीय किंमत १ लाख ४३ हजार ७९४ रुपये इतकी मंजूर झाली होती. तक्रारदार यांच्या मित्राच्यावतीने पाठपुरावा करीत असताना यातील आरोपी खाजगी इसम चव्हाण याने तलाठी तथा आरोपी नळे यांच्या वतीने लाचेची मागणी केली होती.तडजोडीअंती ७ हजार रुपये लाचेची मागणी करून सापळा कारवाई दरम्यान रक्कम आरोपी नळे स्वीकारून त्याच्या स्विफ्ट डिझायर (क्र.एम. एच.१३ सीएएस ५३२८) मधून दि.२९ रोजी रात्री १०.१५ वा.मेटकरी दवाखान्याजवळून फिल्मी स्टाईलने पळून गेले. तद्नंतर पोलीस पथकाने नळे यांच्या तुकाईनगरमधील घराजवळ सापळा लावला असता या ठिकाणी नळे हे त्यांच्या चार चाकी वाहनातून आले होते.या दरम्यान अँटी करप्शनचे अधिकारी व अंमलदार यांनी थांबविण्याचा इशारा करूनही ते न थांबता त्यांच्या ताब्यातील चार चाकी गाडी अतिवेगाने कोणाच्याही जिवाची पर्वा न करता वेगाने वाहन चालवून रकमेसह पळून गेले. यावेळी पोलीस अंमलदार सन्नके यांना घासून गाडी आरोपीने नेल्यामुळे त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून दवाखान्यात उपचार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधिक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार मुल्ला, घाडगे, सन्नके, उडानशिव आदींनी केली.

# सावत्र बापाने मुलीसोबत केले अश्लील चाळे

✔ सुराज्य/सोलापूर


सावत्र बापाने आठ वर्षाच्या मुलीशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी सावत्र बापावर बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पीडितेच्या आईने फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी आपल्या पहिल्या पतीशी वाद होत असल्याने त्या मागील सात वर्षापासून पहिल्या पतीपासून वेगळे राहत त्या आरोपी सोबत राहत होत्या.

त्यांच्या सोबत त्यांची आठ वर्षाची मुलगी व पाच वर्षाचा मुलगा असे दोघे सोबत राहत आहेत. मंगळवारी रात्री घरातील सगळे मंडळी झोपलेले असताना आरोपींने पीडित आठ वर्षाच्या मुलीच्या जवळ जाऊन तिच्याशी अश्लील चाळे केले. यावेळी पीडित मुलगी ही जोरात रडू लागल्याने ही घटना उघडकीस आली. याबाबत पीडितेच्या आईने फिर्याद दिली असून या फिर्यादीवरून आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहे.

# आर्थिक वर्षातील आमदार निधी वाटपाला स्थगिती

✔ **मुंबई** : नव्या आर्थिक वर्षात कुठल्याही आमदाराला निधीचं वाटप करण्यास हायकोर्टानं स्थगिती दिली आहे. गेल्या आर्थिक वर्षात कोणत्या आमदाराला किती निधी दिला? आणि तो कोणाच्या खात्यात जमा केला?, निर्देश हायकोर्टानं राज्य सरकारला दिले आहे.

पुढील आदेश देईपर्यंत कुठल्याही आमदाराला निधींचं वाटप करू नका, असे स्पष्ट आदेश मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. सत्ताधारी आणि विरोधकांच्या आमदार निधी तफावत असल्याचा आरोप करणारी रिट याचिका शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली आहे. विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांना त्यांच्या राजकीय पक्षांच्या आधारे भेदभाव न करता महाराष्ट्र स्थानिक विकास (एमएलडी) निधींचे समान वाटप करण्यात यावं, मात्र तसं होत नाही.



सोलापुरात रामजन्मोत्सवाचा सोहळा गुरुवारी भक्तीभावाने पार पडला. सर्वत्र जल्लोषात प्रभू रामचंद्र यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. पार्क चौकात अयोध्येच्या धर्तीवर श्रीराम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली होती.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी तर वेळच्यावेळी कर भरत असतो !

| कल्याण |
|---|
| 450-95-168 |

| मेन बाजार |
|---|
| 289-93-355 |

# सोलापुरातील मिळकतींची होणार फेरमोजणी

## ५० कोटींपर्यंत उत्पन्न वाढण्याची प्रशासनाला आशा

✔ सुराज्य/मोहोळ

**सोलापूर शहरातील अनेक मालमत्तांना कर आकारणीच झाली नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे आता महापालिका पुढील महिन्यापासून शहरातील मिळकतींची फेरमोजणी करणार आहे. सध्या किती क्षेत्र तथा बांधकामाचा कर भरला जातोय आणि प्रत्यक्षातील सद्य:स्थिती काय आहे, याबाबत कर संकलनचे कर्मचारी, अधिकारी पाहणी करणार आहे. यामुळे जवळपास ५० कोटींपर्यंत उत्पन्न वाढण्याची प्रशासनाला आशा आहे.**



शहराचा विस्तार झाला, लोकसंख्या वाढली. व्यवसाय वाढले आणि घरातील खोल्या, इमारती देखील वाढल्या. मात्र, महापालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली नसल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनेक मालमत्तांना कर आकारणीच नाही. अनेक व्यवसाय गुपचूप सुरू असून काही मिळकतींवर बांधकाम वाढले, मजले, दाने मजले वाढले; पण नवीन कर लागला नाही. या पार्श्वभूमीवर आता अशा मिळकतींची मोजणी होणार असून त्यांची कर आकारणी नव्याने होणार आहे. त्यातून किमान ५० कोटी रुपयांचे उत्पन्न वाढेल, असा विश्वास प्रशासनाला आहे. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी यंदा वास्तववादी बजेट मांडले आहे. तरीपण, उत्पन्नाचा अंदाज व प्रत्यक्षातील वसुली, यात मोठी तफावत जाणवत आहे. त्यामुळे बजेटमधील अंदाज खरे ठरविण्यासाठी वसुली आणि ज्यांना कर आकारणी झालेली नाही, त्यांच्याकडून कर वसुली करणे आवश्यक आहे. त्यादृष्टिने अधिकाऱ्यांनी नियोजन सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोलापुरातील मिळकतींची होणार फेरमोजणी होणार आहे. झोनचे आणि कर संकलनचे कर्मचारी, अधिकारी प्रत्येक मिळकतीला भेट देणार असून त्याठिकाणी जाऊन जागेची व त्यावरील बांधकामाची मोजणी करतील. सध्या किती क्षेत्र तथा बांधकामाचा कर भरला जातोय आणि प्रत्यक्षातील सद्य:स्थिती काय आहे, याची पाहणी करून त्याचा अहवाल प्रशासनाला सादर करणार आहेत.

### १५० अधिकारी व कर्मचारी करताहेत वसुली

शहरातील मिळतकदारांकडील ३२५ कोटी रुपयांची वसुली ३१ मार्चपूर्वी करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी कर संकलन विभागाला दिले. दररोज एक कोटींचे टार्गेट दिले आहे. त्यानुसार तब्बल १५० अधिकारी व कर्मचारी वसुलीसाठी रोज फिरत आहेत. त्यांनी आतापर्यंत १६३ कोटींची वसुली केली आहे.